# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विटा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0660 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/12/2023 21:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 27/12/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2023
**Time From (वेळेपासून):** 12:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/12/2023 **Time (वेळ):** 21:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 050
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/12/2023 21:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** विटा ते कराड जाणारे रोडकडेला,विटा हायस्कुल विटा उत्तर बाजुस,विटा ताखानापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रोहीत राजकुमार पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शाळा नं5 च्या पुढे,भवानी मळा, पाटील वस्ती,विटा, ,खानापूर,विटा,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शाळा नं5 च्या पुढे,भवानी मळा, पाटील वस्ती,विटा, ,खानापूर,विटा,सांगली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. पुंडलिक हिरामण चव्हाण | | | 1. मोहनदरे, ,ता कळवण,,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता. 27/12/2023

मी रोहीत राजकुमार पाटील, वय 28 वर्षे, व्यवसाय :- कस्ट्रक्शन व शेती, रा. भवानी मळा, पाटील वस्ती, शाळा नं.5 च्या पुढे, विटा, ता.खानापूर जि.सांगली. मो.नं.9765215141.
मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझे वडील राजकुमार जोती पाटील, हे विटा नगरपरिषद येथे आरोग्य विभागा मध्ये मुकादम या पदावर कार्यरत होते. माझे वडील दि.29/09/2023 रोजी किडणीचे आजाराने मयत झालेले आहेत.

माझे वडील मयत झाले असलेने त्यांना विटा, नगरपरिषद विटा येथील त्यांचे सेवा कालावधीतील मिळणा-या शासकीय देय रक्कमेचा चेक काढणेसाठी विटा नगरपरिषद येथील आस्थापना विभागा मधील श्री.पुंडलिक चव्हाण, क्लार्क हे 25,000/- रूपये लाच मागत असलेबाबत मी दि. 20/12/2023 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनवर संपर्क साधुन लाच मागणी बाबतची तक्रार सांगितली व मी तक्रार देणेस सांगली येथे येवू शकत नसल्याने आपण विटा येथे येवून माझी तक्रार घेणे बाबत विनंती केली असता पाटील साहेब यांनी मला आम्ही विटा येथे आलेनंतर संपर्क करतो असे सांगितले.
दि.20.12.2023 रोजी 11.15 वा.चे सुमारास पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब यांनी संपर्क करून त्याचेकडील वाहनाचे वर्णन सांगुन एमआयडीसी येथील राणी महाल मल्टीपर्पज हॉल येथे थांबलो असल्याचे सांगुन त्याठिकाणी येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझे इनोव्हा कार नं.एमएच 10 सीके 9005 मधून श्री. संदीप पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी त्यांचे सोबत असले पोलीस निरीक्षक श्री.भिलारे, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे साहेब यांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी श्री.पुंडलिक चव्हाण, क्लार्क आस्थापना विभाग, विटा नगरपरिषद यांनी माझे मयत वडीलांचे विटा, नगरपरिषद विटा येथील त्यांचे सेवा कालावधीतील मिळणा-या शासकीय देय रक्कमेचा चेक काढणेसाठी 25,000/- रूपये लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता भिलारे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून माझा लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक भिलारे साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या. त्यानंतर श्री.चव्हाण, क्लार्क विटा नगरपरिषद यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने भिलारे साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. नितीश कोळी यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. कृष्णात माळी यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचाना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 कोळी असे माझेकडील इनोव्हा कार नं.एमएच 10 सीके 9005 ने रवाना होवून माझे विटा एसटी स्टॅण्ड येथील राजलक्ष्मी एंटरप्रायजेस येथे जाऊन श्री.चव्हाण क्लार्क यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला थोडया वेळाने येत असल्याचे सांगितले. परंतू ते न आलेने मी पुन्हा त्यांना फोन केला असता काही वेळानंतर श्री. चव्हाण हे माझे ऑफीस मध्ये आले. त्यावेळी मी त्यांचेशी माझे वडीलांचे सेवा कालावधीतील मिळणा-या रक्कमेच्या चेक संदर्भात चर्चा केली. त्यावेळी श्री. चव्हाण यांनी मला ते "चेक तयार केलाय आता, तेवढ चेक तुमच्या सवडीने घेवून जावा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "लय दिवस लावलं साहेब" असे म्हणालो. त्यावेळी श्री. चव्हाण यांनी त्यांचे मोबाईलवर 25000 असा आकडा टाईप करून मला दाखवून माझेकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना "25 हजार ना" असे विचारले असता श्री. चव्हाण यांनी मला "हा...काय द्यायचे ते द्या, आमच काही म्हणण नाही.....काम झाल्यावर तुमच्या इच्छेने काय असेल ते करा" असे म्हणाले. त्यावर मी श्री. चव्हाण यांना "कमी जास्त काय नाय ना" असे विचारले असता श्री.चव्हाण यांनी "नाय काय नाय" असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना



Scanned with OKEN Scanner

"किती वाजता येवू दे" असे विचारले त्यावर चव्हाण यांनी मला "आता आम्ही चाललोय जेवायला, दुपारी चार नंतरच"" असे म्हणून चव्हाण हे माझे ऑफीसमधून निघून गेले. त्यानंतर मी व पंच कोळी असे माझे ऑफीसमधून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेबांनी पंच कोळी व मला पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये श्री.चव्हाण, क्लार्क यांनी 25,000/- रूपये लाच रक्कम मागून पुन्हा "काय द्यायचे ते द्या" असे म्हणालेने नेमकी किती लाच रक्कम दयायची याचा निश्चीत आकडा सांगीतला नसल्याने भिलारे साहेब यांनी पुन्हा श्री. चव्हाण यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे निश्चीत केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं.1 म्हणून श्री. कृष्णात माळी यांनी व पंच नं. 2 म्हणून श्री. नितीश कोळी यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं. 1 माळी असे माझेकडील इनोव्हा कार ने विटा नगरपरिषद येथे जावून श्री.चव्हाण, क्लार्क यांना फोन करून "नगरपालिकेजवळ आलोय, तुम्ही कुठे आहे असे विचारले असता चव्हाण यांनी "मी बाहेर वसुलीला आलो होतो....उद्या सकाळी या चेक न्यायला" असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर मी व पंच माळी असे तेथून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो.

सदर पडताळणी कारवाईमध्ये भिलारे साहेबांनी मला व पंच माळी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. झाले एकंदरीत पडताळणी कारवाई मध्ये श्री.चव्हाण, क्लार्क यांनी उदईक दि.21/12/2023 रोजी सकाळी विटा नगरपरिषद येथे येवून चेक घेवून जाणेस सांगितले असल्याने उदईक दि.21/12/2023 रोजी त्यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

दिनांक 21/12/2023 रोजी सकाळी 10.45 वा चे सुमारास मी भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे एमआयडीसी येथील राणी महाल मल्टीपर्पज हॉल येथे येवुन थांबलो. भिलारे साहेब व स्टाफ, शासकिय पंच असे मी थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी भिलारे साहेबांनी मला त्यांचे शासकिय वाहना मध्ये येवुन बसण्यास सांगितले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं.1 म्हणून श्री. कृष्णात माळी यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. नितीश कोळी यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच माळी यांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 माळी असे माझेकडील इनोव्हा कार मधून रवाना होवून विटा नगरपरिषद विटा येथे जावून श्री.चव्हाण मी माझे मोबाईलवर श्री.चव्हाण यांना फोन केला त्यावेळी श्री.चव्हाण यांनी मला "खंडागळे साहेब रजेवर आहेत, सहया झाल्या नाहीत, मंगळवारी साहेब आले की सही घेतो" असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर मी व पंच माळी असे कार मधून खाली उतरून विटा नगरपरिषद इमारतीमध्ये अभिलेख कक्षामध्ये गेलो त्यावेळी श्री.चव्हाण हे सदर ठिकाणी उपस्थित नसल्याने मी तेथील जाधव मॅडम यांचेशी माझे चेक संदर्भात चर्चा केली. त्यानंतर मी कार्यालयातुन बाहेर जात असताना कार्यालयाचे मुख्य दरवाजाजवळ श्री. चव्हाण हे मला भेटले. त्यावेळी श्री.चव्हाण यांनी मला "खंडागळे साहेब रजेवर आहेत....मंगळवार पर्यंत थांबा, मंगळवारी तुम्हाला 5 लाख 93 हजार का 5 लाख 63 हजार चा चेक मिळून जातो...त्याच आठवडयात तुम्हाला अजुन एक चेक द्यायची व्यवस्था करतो" असे म्हणाले. त्यावर मी श्री.चव्हाण यांना "काल तुम्ही म्हणल्या पध्दतीने 25 हजार रूपये कमी-जास्त काय करूया का त्यातच?" असे विचारले त्यावर श्री.चव्हाण यांनी "काय नाय, मंगळवारी बघु" असे म्हणाले. त्यावर मी चव्हाण यांना "एका चेकच तुम्ही म्हणताय त्या पध्दतीने 25 हजार रूपये का सगळयाच मिळून तेवढ?" असे विचारले असता श्री.चव्हाण यांनी मला "तुला जे हाय ना सगळ्यात मिळून द्या" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सगळयात मिळून 25 हजार देतो" असे म्हणालो. त्यावर श्री.चव्हाण यांनी "हा" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "मग किती वाजता येवू" असे विचारले त्यावर श्री.चव्हाण यांनी "मंगळवारी सही झाल्या-झाल्या तुम्हाला फोन करतो, दुपार पर्यंत मिळून जाईल" असे म्हणालेने मी व पंच माळी असे विटा नगरपरिषद येवून रवाना होवून भिलारे साहेबांच्या समक्ष हजर झालो. भिलारे साहेबांनी मला व पंच माळी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये माझे वडिलांचे सेवा कालावधीतील मिळणा-या शासकीय देय रक्कमेचा चेक काढणेसाठी श्री.पुंडलिक चव्हाण, क्लार्क आस्थापना विभाग, विटा नगरपरिषद यांनी माझेकडे 25,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

श्री.पुंडलिक चव्हाण, क्लार्क यांनी मंगळवारी दि. 26/12/2023 रोजी चेकवर सही झालेनंतर कळवित असल्याचे सांगितले असल्याने श्री. चव्हाण यांचेविरूध्द दि. 26/12/2023 रोजी सापळा कारवाई



Scanned with OKEN Scanner

करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

दि.26.12.2023 रोजी सकाळी 11.30 वा चे सुमारास मी भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे एमआयडीसी येथील राणी महाल मल्टीपर्पज हॉल येथे येवुन थांबलो. भिलारे साहेब व स्टाफ, शासकिय पंच असे मी थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी भिलारे साहेबांनी मला त्यांचे शासकिय वाहना मध्ये येवुन बसण्यास सांगितले. त्यावेळी भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे श्री.पुंडलिक चव्हाण, क्लार्क यांना लाच रक्कम देणेसाठी ठिकाण व वेळ निश्चित करण्याकरीता मी माझे मोबाईलवरून श्री.पुंडलिक चव्हाण यांना फोन केला असता श्री.चव्हाण यांनी ते इलेक्शनच्या कामात असून दुपारी जेवण करून आलेवर फोन करतो असे म्हणाले. दुपार पर्यंत श्री.चव्हाण यांचा फोन येणेचा वाट पाहून पुन्हा श्री.चव्हाण यांना फोन केला असता त्यांनी ऑफीसला जावून चेक करून, फोन करतो असे म्हणाले. पुन्हा सध्यांकाळ पर्यंत श्री.चव्हाण यांचे फोनची वाट पाहून मी पुन्हा श्री.चव्हाण यांना फोन केला असता त्यांना मला एक अकाऊटंटची सही झाली आहे, दुस-या साहेबाची बाकी आहे, नाहीतर उद्या सकाळी होवून जाईल असे म्हणाले. वरील सर्व कार्यवाही ही भिलारे साहेब यांनी दोन्ही पंचांसमक्ष केलेली असून सदर फोनवरील संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डिंग मध्ये रेकॉर्डिंग केले आहे. आम्ही बराच वेळ श्री.चव्हाण यांचे फोनची वाट पाहिली परंतू त्यांचा फोन आला नाही व कार्यालयीन वेळ संपून गेलेने भिलारे साहेब यांनी दि.27.12.2023 रोजी सकाळी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवले.

दि.27.12.2023 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास मी भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे एमआयडीसी येथील राणी महाल मल्टीपर्पज हॉल येथे येवुन थांबलो. भिलारे साहेब व स्टाफ, शासकिय पंच असे मी थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी भिलारे साहेबांनी मला त्यांचे शासकिय वाहना मध्ये येवुन बसण्यास सांगितले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं 1 माळी यांना विटा नगरपरिषद येथे श्री.चव्हाण यांचेकडे सापळाकामी पाठविण्याचे निश्चित केले. भिलारे साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता मी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 50 नोटा असे एकुण 25,000/- रूपये हजर केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी लाच

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

santosh gundopant doke(I (Inspector)) / SGDM7903 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh gundopant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): SGDM7903

पो.स्टे.ऑफिसर
विटा पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner